RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ४, अंक ३(४)] बुधवार, जानेवारी १७, २०१८/पौष २७, शके १९३९ [पृष्ठे १५, किंमत : रुपये २३.००

### असाधारण क्रमांक १५

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५.—** महाराष्ट्र राज्यातील सर्व प्रकारची उद्‌वाहने, सरकते जिने, सरकते मार्ग आणि त्याच्याशी संबंधित सर्व यंत्रसामग्री व साधनसामग्री यांची बांधणी, उभारणी, परिरक्षण व सुरक्षित वापर यांचे विनियमन करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तद्‌नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम. . . | पृष्ठे १-१४ |

दिनांक १६ जानेवारी २०१८ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**राजेन्द्र ग. भागवत,**
प्रभारी सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

### सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **“ महाराष्ट्र शासन राजपत्रात ”** दिनांक १७ जानेवारी २०१८ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र राज्यातील सर्व प्रकारची उद्‌वाहने, सरकते जिने, सरकते मार्ग आणि त्यांच्याशी संबंधित सर्व यंत्रसामग्री व साधनसामग्री यांची बांधणी, उभारणी, परिरक्षण व सुरक्षित वापर यांचे विनियमन करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तद्‌नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** तंत्रज्ञान व मानके यांमध्ये झपाट्याने होत असलेल्या प्रगतीमुळे, उद्‌वाहनांच्या क्षेत्रात लक्षणीय बदल घडून आलेले आहेत, आणि सरकते जिने, सरकते मार्ग यांसारखी नवनवीन साधनसामग्री अस्तित्वात आली
१९३९ चा १०. आहे, या नवीन साधनसामग्रीचा महाराष्ट्र उद्‌वाहन अधिनियमामध्ये समावेश करण्यात आलेला नाही ;

**आणि ज्याअर्थी,** तंत्रज्ञान व मानके यांमध्ये झपाट्याने होत असलेली प्रगती विचारात घेता, सर्व प्रकारची उद्वाहने, सरकते जिने, सरकते मार्ग आणि त्यांच्याशी संबंधित सर्व यंत्रसामग्री व साधनसामग्री यांची बांधणी, उभारणी, परिरक्षण व सुरक्षित वापर यांचे विनियमन करण्यासाठी तरतूद करण्याकरिता आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता एक सर्वसमावेशक कायदा करणे इष्ट वाटते ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या अडुसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

प्रकरण एक

**प्रारंभिक**

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र उद्वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग अधिनियम, २०१७, असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल.

व्याख्या.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) "मान्यताप्राप्त कंत्राटदार" किंवा "कंत्राटदार" याचा अर्थ, मुख्य विद्युत निरीक्षकाने उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग यांची उभारणी, परिरक्षण किंवा चाचणी करण्यासाठी निर्गमित केलेली अनुज्ञप्ती धारण करणारी व्यक्ती किंवा व्यवसाय संस्था किंवा कंपनी, असा आहे ;

(ख) "सहायक विद्युत निरीक्षक (उद्वाहने)" याचा अर्थ, विद्युत निरीक्षक (उद्वाहने) यास सहाय्य करण्यासाठी कलम ३ च्या पोट-कलम (४) अन्वये शासनाने नियुक्त केलेली व्यक्ती, असा आहे ;

(ग) "प्राधिकृत प्रतिनिधी" याचा अर्थ, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, मालकाच्या वतीने कृती करण्यासाठी मालकाने अधिकार प्रदान केलेली व्यक्ती किंवा व्यवसाय संस्था, असा आहे ;

(घ) "स्तंभिका कठडा" याचा अर्थ, वापरकर्त्यास स्थिरता देऊन, सरकत्या भागांपासून त्याचे संरक्षण करून आणि संरक्षित पट्ट्यांस आधार देऊन त्याद्वारे वापरकर्त्याची सुरक्षितता सुनिश्चित करणारा, सरकत्या जिन्याचा किंवा सरकत्या मार्गाचा भाग, असा आहे ;

(ङ) "रोधक भार" याचा अर्थ, पायरी किंवा संधिपट्टी किंवा पट्टा यावरील भार, ज्यासाठी सरकता जिना किंवा सरकता मार्ग थांबविण्याकरिता केलेली रोधक यंत्रणेची रचना असेल, असा आहे ;

(च) "मुख्य विद्युत निरीक्षक" किंवा "विद्युत निरीक्षक (उद्वाहने)" याचा अर्थ, कलम ३ अन्वये शासनाने मुख्य विद्युत निरीक्षक किंवा विद्युत निरीक्षक (उद्वाहने) म्हणून नियुक्त केलेली व्यक्ती, असा आहे ;

(छ) "सरकता जिना" याचा अर्थ, सतत सरकत राहणारा ऊर्जाचलित अभिनत जिना, जो व्यक्तींना वर नेण्यासाठी किंवा खाली आणण्यासाठी वापरला जातो, ज्यामध्ये वापरकर्ता वहन पृष्ठभाग म्हणजे पायऱ्या क्षितिज समांतर राहतात, असा आहे ;

(ज) "सरकत्या जिन्याची संचमांडणी" याचा अर्थ, अशी संचमांडणी ज्यामध्ये सरकता जिना, कार्यचालन यंत्रणा, चक्रांतर, कैच्या किंवा तुळ्या, स्तंभिका कठडा, जिन्याची पायरी व जिन्याची सपाटी आणि सरकता जिना चालविण्याच्या कामाशी प्रत्यक्ष संबंध असलेल्या सर्व साखळ्या, तारा व संयंत्रे यांचा अंतर्भाव होतो, असा आहे ;

(झ) "शासन" किंवा "राज्य शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(ञ) "प्रारंभिक निरीक्षण" याचा अर्थ, अनुज्ञप्ती देण्यापूर्वी सुरक्षिततेच्या दृष्टीने उद्वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग याच्या सर्व सुरक्षा साधनांचे ती कार्यरत असल्याबाबतचे निरीक्षण किंवा तपासणी यांसह प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी घेतलेल्या चाचण्यांच्या अहवालांची पडताळणी, सर्व संबंधित दस्तऐवजांची पडताळणी, असा आहे ;

(ट) "अनुज्ञप्ती" याचा अर्थ, या अधिनियमान्वये दिलेली अनुज्ञप्ती, असा आहे ;

(ठ) "उद्‌वाहन" याचा अर्थ, ऊर्ध्व दिशेतील रुळमार्गांमध्ये सरकते आणि जिला विद्युत संकर्षण किंवा द्रविकचालन उपकरणासह आरोही व अवरोही यंत्रणा बसविलेली असते, आणि जी नियत थांब्यांवर थांबते आणि जिला रज्जुंद्वारे किंवा बंधांद्वारे किंवा जॅकद्वारे लटकवली जाते, अशी प्रवासी किंवा माल किंवा दोन्हींना सुरक्षितपणे वाहून नेण्यासाठी रचना केलेली साधनसामग्री, असा आहे, मात्र त्यामध्ये कारखाना अधिनियम, १९४८ यात अंतर्भूत असलेल्या उच्चलनयंत्रांचा किंवा उद्‌वाहनांचा समावेश होणार नाही ; १९४८ चा ६३.

(ड) "उद्‌वाहन गाडी" याचा अर्थ, प्रवासी किंवा माल किंवा दोन्ही किंवा मोटार गाड्या वाहून नेण्यासाठी उपयोगात आणले जाणारे उद्‌वाहन यान किंवा गाडी, असा आहे आणि त्यामध्ये तळमजला किंवा उच्चासन, गाडीची चौकट, भारयष्टी व छत व दरवाजा किंवा दरवाजे यांसह परिवेष्टन करणारा मुख्य भाग, यांचा समावेश होतो ;

(ढ) "उद्‌वाहन संचमांडणी" यामध्ये, उद्‌वाहन गाडी, उद्‌वाहन कूप, उद्‌वाहनाची कार्यचालन यंत्रणा आणि उद्‌वाहन चालविण्याच्या कामाशी प्रत्यक्ष संबंध असलेले सर्व रज्जु किंवा पट्टे, केबल्स, तारा व संयंत्र यांचा समावेश होतो ;

(ण) "उद्‌वाहन खड्डा" याचा अर्थ, उद्‌वाहन कूपामधील, सर्वात खालच्या थांब्याखालची मोकळी जागा, असा आहे ;

(त) "सरकता मार्ग" याचा अर्थ, व्यक्ती अथवा प्रवासी यांचे वहन करण्याकरिता असलेली ऊर्जा-चलित संयंत्रणा, ज्यामध्ये वापरकर्त्याचे वहन करणारा पृष्ठभाग त्याच्या गतीच्या दिशेशी समांतर व अखंडित असतो (उदा. संधिपट्टी, पट्टे), असा आहे ;

(थ) "सरकता मार्ग संचमांडणी" याचा अर्थ, अशी संचमांडणी, ज्यामध्ये सरकता मार्ग, कार्यचालन यंत्रणा, चक्रांतर, कैच्या किंवा तुळ्या, स्तंभिका कठडा, पायरी व जिन्याची सपाटी आणि सरकता मार्ग चालविण्याच्या कामाशी प्रत्यक्ष संबंध असलेल्या सर्व साखळ्या, तारा व संयंत्रे यांचा अंतर्भाव होतो, असा आहे ;

(द) "भोगवटादार" याचा अर्थ, जेथे उद्‌वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग यांची उभारणी केली आहे किंवा उभारणी करण्याचे प्रस्तावित केले आहे अशा जागेचा मालक किंवा भोगवटा करणारी व्यक्ती, असा आहे ;

(ध) "मालक" याचा अर्थ, उद्‌वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग यांची मालकी असणारी किंवा ते चालविणारी किंवा त्यांचे परिरक्षण करणारी व्यक्ती किंवा व्यक्तींची संस्था किंवा निगम निकाय, असा आहे ;

(न) "नियतकालिक निरीक्षण" याचा अर्थ, प्रारंभिक निरीक्षणानंतर, वर्षातून किमान एकदा किंवा शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा त्याआधीच्या ठराविक कालांतराने प्रत्यक्ष जागेवर जाऊन चाचणी अहवालांची केलेली पडताळणी, सुरक्षा साधने कार्यरत असल्याबाबतची तपासणी किंवा निरीक्षण, आणि उद्‌वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग याच्या सर्व संबंधित दस्तऐवजांची केलेली पडताळणी, असा आहे ;

(प) "शक्ती (पॉवर)" याचा अर्थ, जी मानवांच्या किंवा जनावरांच्या सहाय्याने उत्पन्न केली जात नाही अशी कोणत्याही प्रकारची शक्ती, असा आहे ;

(फ) "विहित" याचा अर्थ, नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(ब) "निर्धारित भार" किंवा "ठरावी भार" याचा अर्थ, मंजूर आरेखनामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, जो भार वाहण्यासाठी उद्‌वाहनाची रचना केली आहे तो भार, असा आहे ;

(भ) "निर्धारित वेग" याचा एखाद्या उद्‌वाहनाच्या संबंधातील अर्थ, उद्‌वाहन गाडीचा वरच्या किंवा खालच्या दिशेने जाण्याच्या कोणत्याही भागातील कमाल वेग, ज्यासाठी उद्‌वाहन साधनसामग्रीची रचना केलेली आहे आणि सरकते जिने किंवा सरकते मार्ग यांच्या संबंधातील अर्थ, पायऱ्या, संधिपट्टी किंवा पट्टे यांच्या चलनाच्या दिशेने असलेला वेग ज्यासाठी सरकते जिने किंवा सरकते मार्ग यांची मंजूर आरेखनामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे रचना केलेली आहे असा वेग, असा आहे ;

(म) "नियम" याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेले नियम, असा आहे.

प्रकरण दोन

## मुख्य विद्युत निरीक्षक, विद्युत निरीक्षक (उद्‌वाहने), सहायक विद्युत निरीक्षक (उद्‌वाहने) इत्यादी यांची नियुक्ती आणि त्यांचे अधिकार व कार्ये.

मुख्य विद्युत निरीक्षक, विद्युत निरीक्षक (उद्‌वाहने) आणि सहायक विद्युत निरीक्षक (उद्‌वाहने) यांची नियुक्ती.

**३.** (१) राज्य शासनास, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विहित करण्यात येईल अशी अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तींची,—

(अ) मुख्य विद्युत निरीक्षक ;

(ब) विद्युत निरीक्षक (उद्‌वाहने) ;

म्हणून नियुक्ती करता येईल.

(२) अशा रीतीने नियुक्त केलेला मुख्य विद्युत निरीक्षक हा, या अधिनियमान्वये त्याला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांबरोबरच, संपूर्ण राज्यात विद्युत निरीक्षक (उद्‌वाहने) यांच्या अधिकारांचाही वापर करील.

(३) अशा रीतीने नियुक्त केलेला प्रत्येक विद्युत निरीक्षक (उद्‌वाहने), राज्य शासन आदेशाद्वारे निदेश देईल अशा क्षेत्रांमध्ये किंवा उद्‌वाहनांच्या किंवा सरकत्या जिन्यांच्या किंवा सरकता मार्ग संचमांडणीच्या अशा प्रवर्गाच्या संबंधात आणि अशा शर्तींना अधीन राहून, या अधिनियमाखालील विद्युत निरीक्षक (उद्‌वाहने) याच्या अधिकारांचा वापर करील आणि त्याची कार्ये पार पाडील.

(४) राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विद्युत निरीक्षक (उद्‌वाहने) याला सहाय्य करण्यासाठी विहित करण्यात येईल अशी अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तींची सहायक विद्युत निरीक्षक (उद्‌वाहने) म्हणून नियुक्ती करता येईल.

(५) शासनास, विद्युत निरीक्षक (उद्‌वाहने) किंवा सहायक विद्युत निरीक्षक (उद्‌वाहने) याला सहाय्य करण्यासाठी, विहित करण्यात येईल अशी अर्हता धारण करणाऱ्या, त्यास आवश्यक वाटतील इतक्या तांत्रिक व इतर व्यक्तींची नियुक्ती करता येईल.

प्रकरण तीन

## उद्‌वाहन, सरकता जिना व सरकता मार्ग उभारण्याची परवानगी आणि ते चालविण्यासाठी अनुज्ञप्ती देणे.

उद्‌वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग उभारण्याची परवानगी.

**४.** (१) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, एखाद्या जागेत उद्‌वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग उभारण्याचा इरादा असणारा, अशा जागेचा प्रत्येक मालक, असे उद्‌वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग उभारण्याची परवानगी मिळण्यासाठी विद्युत निरीक्षक (उद्‌वाहने) याच्याकडे विहित करण्यात येईल अशा नमुन्यात अर्ज करील. अशा अर्जासोबत उद्‌वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग यांच्या उभारणीचा आराखडा विहित करण्यात येईल अशा रीतीने सादर करण्यात येईल. अशा अर्जात पुढील बाबींचा अंतर्भाव करण्यात येईल :-

(एक) उद्‌वाहनाच्या बाबतीत :

(१) उद्‌वाहनाचा प्रकार ;

(२) उद्‌वाहनाचा निर्धारित वेग ;

(३) उद्‌वाहनाची प्रवासी क्षमता ;

(४) उद्‌वाहनाचा निर्धारित भार ;

(५) कमाल भार वाहून नेताना उद्‌वाहन गाडीचे एकूण वजन ;

(६) उद्‌वाहनाच्या प्रतिभाराचे वजन ;

(७) उद्‌वाहनाच्या सहाय्यभूत निलंब मध्यगाचा क्रमांक, वर्णन, वजन व आकार ;

(८) उद्‌वाहन खड्डा आणि उद्‌वाहनाच्या उपरिभागाची उंची ;

(९) उद्‌वाहन थांब्यांची संख्या ;

(१०) विहित करण्यात येतील अशा इतर बाबी.

(दोन) सरकत्या जिन्याच्या किंवा सरकत्या मार्गाच्या बाबतीत :

(१) सरकत्या जिन्याचा किंवा सरकत्या मार्गाचा प्रकार ;

(२) सरकत्या जिन्याचा किंवा सरकत्या मार्गाचा निर्धारित वेग ;

(३) सरकत्या जिन्याची किंवा सरकत्या मार्गाची दर ताशी प्रवासी वाहून नेण्याची निर्धारित वहन क्षमता ;

(४) सरकत्या जिन्याचा किंवा सरकत्या मार्गाचा रोधक भार ;

(५) सरकत्या जिन्याचा किंवा सरकत्या मार्गाचा अभिनत कोन ;

(६) सरकत्या जिन्याच्या किंवा सरकत्या मार्गाच्या स्तंभिका कठड्याचा प्रकार ;

(७) सरकत्या जिन्याच्या किंवा सरकत्या मार्गाच्या स्तंभिका कठड्यांमधील पायरीची रुंदी ;

(८) सरकत्या जिन्याचे किंवा सरकत्या मार्गाचे एकूण मार्गक्रम, उंची, जिन्याची सपाटी यांचा तपशील ;

(९) सपाट पायऱ्यांची संख्या ;

(१०) स्थिर भारावर आधारित चालन घटकांसाठी सुरक्षांक ;

(११) विहित करण्यात येतील अशा इतर बाबी.

(२) पोट-कलम (१) अन्वये उभारणीची किंवा बसविण्याची परवानगी देण्यासाठीच्या प्रत्येक अर्जासोबत, शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील असे, शुल्क भरलेले असेल.

(३) असा अर्ज प्राप्त झाल्यावर, विद्युत निरीक्षक (उद्‌वाहने) त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यावर आणि अशी माहिती सादर करण्यास अर्जदाराला फर्माविल्यावर त्याच्या अभिप्रायासह तो अर्ज मुख्य विद्युत निरीक्षकाकडे पाठवील, त्यांनतर, त्या मुख्य विद्युत निरीक्षकास एकतर उद्‌वाहन, सरकता जिना किंवा, यथास्थिति, सरकता मार्ग उभारण्यासाठी किंवा तो बसविण्यासाठी एकतर परवानगी देता येईल किंवा ती परवानगी नाकारता येईल. अशी परवानगी देण्यात आल्यास ती ज्या दिनांकास देण्यात आली असेल त्या दिनांकापासून केवळ एक वर्षाच्या कालावधीसाठी, किंवा पुरेशा लेखी कारणांस्तव मुख्य विद्युत निरीक्षक मुभा देईल अशा एकावेळी आणखी सहा महिन्यांच्या कालावधीसाठी, वैध असेल.

(४) कोणतीही व्यक्ती, उद्‌वाहनाची, सरकत्या जिन्याची किंवा सरकत्या मार्गाची मालक यांसह, मुख्य विद्युत निरीक्षकाकडून उद्‌वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग उभारण्याची किंवा बसविण्याची पूर्व परवानगी मिळविल्याशिवाय आपले उद्‌वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग उभारणार नाही किंवा तो बसविणार नाही.

(५) पोट-कलम (३) खाली परवानगी दिल्यावर, मालक, या अधिनियमान्वये वैध मान्यताप्राप्त कंत्राटदाराकडून उद्‌वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग उभारील किंवा बसवील.

उद्‌वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग उभारण्यासाठी, त्यांचे परिरक्षण करण्यासाठी विद्युत कंत्राटदाराला अनुज्ञप्ती देणे.

**५.** (१) उद्‌वाहने, सरकते जिने किंवा सरकते मार्ग उभारण्यासाठी, त्याच्या परिरक्षणासाठी व चाचणीसाठी अनुज्ञप्ती मिळविण्याचा हेतू असणारी व वीज अधिनियम, २००३ अन्वये तयार केलेल्या केंद्रीय विद्युत प्राधिकरण (सुरक्षा व विद्युत पुरवठा यासंबंधी उपाययोजना) विनियम, २०१० याच्या तरतुदींन्वये घटित करण्यात आलेल्या अनुज्ञापक मंडळाने दिलेली वैध विद्युत कंत्राटदार अनुज्ञप्ती असणारी कोणतीही व्यक्ती किंवा व्यक्तींची संस्था किंवा निगम निकाय, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात विद्युत निरीक्षक (उद्‌वाहने) याच्याकडे अर्ज करील. अशा अर्जासोबत शासन वेळोवेळी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील असे शुल्क भरलेले असेल.

२००३ चा ३६.

(२) असा अर्ज प्राप्त झाल्यानंतर विद्युत निरीक्षक (उद्‌वाहने) यास, आवश्यक असेल अशी माहिती सादर करण्यास अर्जदाराला फर्मावता येईल आणि अशी चौकशी केल्यानंतर, त्याच्या अभिप्रायांसह असा अर्ज मुख्य विद्युत निरीक्षकाकडे अग्रेषित करता येईल.

(३) मुख्य विद्युत निरीक्षकास, विहित करण्यात येईल अशा अटी व शर्तींना अधीन राहून, उद्‌वाहने, सरकते जिने किंवा सरकते मार्ग उभारण्यासाठी, त्यांच्या परिरक्षणासाठी व चाचणीसाठी विहित करण्यात येईल अशा नमुन्यात, अशा व्यक्ती, व्यक्तींची संस्था किंवा निगम निकाय यांना अनुज्ञप्ती देता येईल किंवा अनुज्ञप्ती नाकारण्याची कारणे नोंदवून ती नाकारता येईल.

(४) पोट-कलम (३) अन्वये दिलेली अनुज्ञप्ती ही, केंद्रीय विद्युत प्राधिकरण (सुरक्षा व विद्युत पुरवठा यासंबंधी उपाययोजना) विनियम, २०१० या अन्वये दिलेल्या विद्युत कंत्राटदार अनुज्ञप्तीच्या वैधतेच्या अधीन राहून, शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करता येईल, अशा कालावधीसाठी वैध असेल.

(५) पोट-कलम (३) अन्वये दिलेल्या अनुज्ञप्तीच्या नूतनीकरणासाठीचा अर्ज, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात, अनुज्ञप्तीच्या किंवा, यथास्थिति, नूतनीकरण केलेल्या अनुज्ञप्तीच्या समाप्तीच्या दिनांकापूर्वी किमान तीस दिवस अगोदर संबंधित विद्युत निरीक्षक (उद्‌वाहने) याच्यामार्फत मुख्य विद्युत निरीक्षकाकडे सादर करण्यात येईल आणि अर्जासोबत, शासन वेळोवेळी **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील असे शुल्क भरलेले असेल.

उद्‌वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग चालू करण्याची अनुज्ञप्ती देण्यापूर्वी प्रारंभिक निरिक्षण.

**६.** (१) उद्‌वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग चालवण्याबाबतची अनुज्ञप्ती देण्यापूर्वी, विद्युत निरीक्षक (उद्‌वाहने) किंवा सहायक विद्युत निरीक्षक (उद्‌वाहने) उद्‌वाहन किंवा सरकता जिना किंवा, यथास्थिति, सरकता मार्ग सुरक्षितपणे चालू आहे याचे, विहित करण्यात येईल अशा रीतीने निरीक्षण करील आणि प्रत्यक्ष जागी घेतलेल्या चाचण्यांच्या अहवालांची आणि सर्व संबंधित दस्तऐवजांची पडताळणी करील.

(२) प्रारंभिक निरीक्षणासाठी, शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा दराप्रमाणे, निरीक्षण शुल्क आकारण्यात येईल.

उद्‌वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग चालू करण्यासाठी अनुज्ञप्ती.

**७.** (१) कलम ४ खाली उद्‌वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग उभारण्यासाठी किंवा बसविण्यासाठी ज्याला परवानगी देण्यात आली असेल असा जागेचा प्रत्येक मालक, असे उद्‌वाहन, किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग उभारण्याचे किंवा बसविण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर, एक महिन्याच्या आत, असे काम पूर्ण झाल्याची लेखी सूचना विद्युत निरीक्षक (उद्‌वाहने) याला देईल किंवा पाठवील किंवा देण्याची किंवा पाठविण्याची व्यवस्था करील, आणि उद्‌वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग चालवण्याच्या किंवा वापरण्याच्या अनुज्ञप्तीकरिता त्याच्याकडे अर्ज करील.

(२) पोट-कलम (१) अन्वये अनुज्ञप्तीसाठीचा अर्ज हा, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात असेल. अशा अर्जासोबत, शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करील असे शुल्क भरलेले असेल.

(३) असा अर्ज प्राप्त झाल्यावर, विद्युत निरीक्षक (उद्‌वाहने), आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, आपल्या अभिप्रायासह तो अर्ज मुख्य विद्युत निरीक्षकाकडे पाठवील. मुख्य विद्युत निरीक्षकास, त्यानंतर, विहित करण्यात येतील अशा नमुन्यात आणि अशा अटी व शर्तींना अधीन राहून आणि एकतर अनुज्ञप्ती देता येईल किंवा अनुज्ञप्ती देण्यास नकार देता येईल.

(४) मुख्य विद्युत निरीक्षक पोट-कलम (३) खाली अनुज्ञप्ती देण्यास नकार देण्याची कारणे लेखी नमूद करील.

(५) ज्याला पोट-कलम (३) खाली अनुज्ञप्ती देण्यात आली असेल असा मालक, या अधिनियमाखाली अनुज्ञप्ती दिलेल्या मान्यताप्राप्त कंत्राटदाराकडून आपल्या उद्‌वाहनाचे, सरकत्या जिन्याचे किंवा सरकत्या मार्गाचे परिरक्षण करून घेईल.

(६) अनुज्ञप्तीसाठीच्या अर्जासोबत मान्यताप्राप्त कंत्राटदाराने स्वाक्षरी केलेले पुढील नमुन्यातील प्रमाणपत्र जोडलेले असेल :—

"मी ........................................, मान्यताप्राप्त कंत्राटदार असून, महाराष्ट्र उद्‌वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग अधिनियम, २०१७ व त्याखाली केलेले नियम यानुसार उद्‌वाहनाची, सरकत्या जिन्याची किंवा सरकत्या मार्गाची तपासणी, निरीक्षण व चाचणी केलेली आहे आणि माझ्या मते ती उभारणी ही वापरासाठी योग्य आहे. ".

उद्‌वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग चालू करण्यासाठीच्या अनुज्ञप्तीची वैधता.

**८.** (१) उद्‌वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग चालू करण्यासाठी देण्यात आलेली अनुज्ञप्ती, ती ज्या दिनांकास देण्यात आली असेल त्या दिनांकापासून वीस वर्षांच्या कालावधीसाठी वैध असेल.

(२) अनुज्ञप्तीचा कालावधी समाप्त होण्यापूर्वी, अनुज्ञप्तीधारकास त्याच्या नूतनीकरणासाठी अर्ज करता येईल. उद्‌वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग याच्या सुरक्षित चालनाविषयी विद्युत निरीक्षक (उद्‌वाहने) याची खात्री पटण्याच्या अधीन राहून एकावेळी पाच वर्षांहून अधिक नसेल इतक्या कालावधीसाठी अनुज्ञप्तीचे नूतनीकरण करता येईल.

(३) अनुज्ञप्तीचे नूतनीकरण हे, उद्‌वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग यांचे योग्य परिरक्षण करण्याच्या अधीन असेल.

(४) अनुज्ञप्तीच्या नूतनीकरणासाठीच्या अर्जासोबत, शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करील असे, शुल्क भरलेले असेल.

(५) विद्युत निरीक्षक (उद्‌वाहने) यास, अनुज्ञप्तीचे नूतनीकरण करण्यापूर्वी, उद्‌वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग यांमध्ये सुरक्षाविषयक सुधारणा करण्यासाठी त्याबाबतीत त्या उद्‌वाहनाचे, सरकत्या जिन्याचे किंवा सरकत्या मार्गाचे मोठ्या प्रमाणावर आधुनिकीकरण करण्यासह आवश्यक असल्यास, विवक्षित अटी लादता येतील.

विद्यमान सरकते जिने किंवा सरकते मार्ग चालू असल्यास, अनुज्ञप्तीसाठी अर्ज करणे.

**९.** (१) कलमे ४ व ७ यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या जागी या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी सरकता जिना किंवा सरकता मार्ग बसविण्यात आला असेल त्या जागेचा प्रत्येक मालक, अशा प्रारंभाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत, विद्युत निरीक्षक (उद्‌वाहने) याच्याकडे असा सरकता जिना किंवा सरकता मार्ग चालू करण्याच्या अनुज्ञप्तीसाठी अर्ज करील. योग्य समर्थनासह अर्ज करण्यात आल्यावर वर उल्लेखिलेला सहा महिन्यांचा कालावधी आदेशाद्वारे आणि लेखी नोंदवावयाच्या कारणास्तव आणखी सहा महिन्यांकरिता वाढविता येऊ शकेल.

(२) कलम ७ ची पोट-कलमे (२), (३), (४) आणि (५) यांच्या तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह, पोट-कलम (१) खालील अशा अर्जास लागू असतील.

बसवलेले उद्‌वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग यांमध्ये वाढीव काम करणे किंवा त्यात फेरफार करणे.

**१०.** कोणतेही वाढीव काम किंवा फेरफार, ज्यामुळे उद्‌वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग यांचे गुणवैशिष्ट, जसे प्रवासी क्षमता, वेग, थांबे, पायऱ्या, इत्यादी, यांमध्ये किंवा कलम २१ अन्वये आवश्यक असतील अशा बदलांव्यतिरिक्त बदल घडून येतील असे कोणतेही वाढीव काम किंवा फेरफार हे, विद्युत निरीक्षक (उद्‌वाहने) याची लेखी पूर्व परवानगी घेतल्याखेरीज केले जाणार नाहीत.

उद्‌वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग अनुज्ञप्तीशिवाय कार्यान्वित करणे.

**११.** उद्‌वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग याबाबत देण्यात आलेल्या अनुज्ञप्तीच्या अटी व शर्तीनुसार आणि त्यास अनुरूप असल्याखेरीज कोणतेही उद्‌वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग सुरू करण्यात येणार नाही किंवा वापरण्यात येणार नाही.

व्यवसाय संहिता.

**१२.** (१) या अधिनियमात अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्याखेरीज, भारतीय मानक संस्थेच्या संबद्ध व्यवसाय संहितेचे, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ अनुपालन करण्यात येईल आणि कोणतीही विसंगती असल्यास, या अधिनियमाच्या तरतुदी आणि त्याखाली करण्यात आलेले नियम अभिभावी ठरतील.

(२) उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग आणि त्यामध्ये वापरण्यात येणारी सामग्री व साधनसामग्री यांसाठीचे विनिर्देश हे, भारतीय मानक संस्थेने जेथे असे विनिर्देश अगोदरच निर्धारित केले असतील तेथे, अशा संबद्ध विनिर्देशांशी किंवा त्यासाठी केलेल्या नियमांशी अनुरूप असतील.

(३) परिवास्तूमध्ये बसवावयाच्या उद्वाहनांची, सरकत्या जिन्यांची किंवा सरकत्या मार्गांची संख्या आणि त्यामधील अंतर हे भारतीय मानक संस्थेच्या संबद्ध व्यवसाय संहिता किंवा राष्ट्रीय इमारत संहिता यानुसार असेल.

## प्रकरण चार

## उद्वाहन, सरकता जिना व सरकता मार्ग आणि त्यांची संचमांडणी यांचे निरीक्षण

उद्वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग आणि त्यांची संचमांडणी यांचे निरीक्षण करण्यासाठी कोणत्याही इमारतीमध्ये प्रवेश करण्याचा अधिकार.

**१३.** राज्य शासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास, उद्वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग आणि त्यांची संचमांडणी यांचे निरीक्षण करण्यासाठी, कोणत्याही इमारतीमध्ये प्रवेश करण्याचा अधिकार असेल. अशा प्राधिकाऱ्यास, इमारतीत ज्या जागी उद्वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग बसविला असेल किंवा बसविण्यात येत असेल किंवा त्यासंदर्भात अनुज्ञप्तीसाठी अर्ज प्राप्त झाला असेल किंवा अन्यथा संचमांडणीसह तेथील उद्वाहनाचे किंवा सरकत्या जिन्याचे किंवा सरकत्या मार्गाचे किंवा उद्वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग किंवा तेथील जागेचे निरीक्षण करण्याच्या प्रयोजनार्थ भोगवटादाराला वाजवी नोटीस दिल्यानंतर, अशा कोणत्याही इमारतीत, कोणत्याही वेळी प्रवेश करता येईल.

उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग यांच्या निरीक्षणासाठी मालकाने सुविधा देणे.

**१४.** इमारतीत ज्या जागी उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग बसविण्यात आला असेल त्या इमारतीचा मालक किंवा त्याचा प्राधिकृत प्रतिनिधी, उद्वाहनाचे किंवा सरकत्या जिन्याचे किंवा, यथास्थिति, सरकत्या मार्गाचे निरीक्षण करण्यासाठी विद्युत निरीक्षक (उद्वाहने) किंवा त्याने याबाबत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास आवश्यक त्या सर्व सुविधा पुरवील आणि विद्युत निरीक्षक (उद्वाहने) किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास, आवश्यक वाटल्यास, उद्वाहनाच्या, सरकत्या जिन्याच्या किंवा सरकत्या मार्गाच्या कंत्राटदारास उपस्थित राहण्यास सांगील.

अपघात व चौकशी याबाबतचा अहवाल देणे.

**१५.** (१) जेव्हा कोणतेही उद्वाहन, सरकता जिना किंवा, यथास्थिति, सरकता मार्ग कार्यान्वित असताना कोणताही अपघात घडेल व त्यायोगे कोणत्याही व्यक्तीस दुखापत किंवा जीवितहानी होईल किंवा दुखापत होण्याचा किंवा जीवितहानी होण्याचा संभव असेल, तेव्हा, ज्या इमारतीत उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग चालू असेल, त्या इमारतीचा मालक किंवा भोगवटादार किंवा मालकाचा प्राधिकृत प्रतिनिधी किंवा जर अशा मालकाने, पोट-कलम (२) अन्वये प्राधिकृत प्रतिनिधी नेमला असेल आणि त्याचे नाव पोट-कलम (३) अन्वये विद्युत निरीक्षक (उद्वाहने) यास कळविले असेल तर, असा प्राधिकृत प्रतिनिधी, असा अपघात घडल्याची आणि अपघातामुळे प्रत्यक्षात झालेली कोणतीही अशी जीवितहानी किंवा दुखापत यांची सूचना किंवा नोटीस आणि त्यानंतर अपघाताचा तपशीलवार अहवाल विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशा मुदतीत विद्युत निरीक्षक (उद्वाहने) यास किंवा राज्य शासन, आदेशाद्वारे निदेश देईल अशा प्राधिकृत अधिकाऱ्याला आणि इतर प्राधिकरणांना देईल. उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग संचमांडणीमध्ये कोणत्याही प्रकारे ढवळाढवळ करण्यात येणार नाही आणि असे उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग विद्युत निरीक्षक (उद्वाहने) यांनी लेखी परवानगी दिल्याखेरीज पुन्हा सुरू करण्यात येणार नाहीत.

(२) पोट-कलम (१) च्या प्रयोजनासाठी, इमारतीत ज्या जागी उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग बसविण्यात आला असेल अशा इमारतीचा मालक, अशा इमारतीत राहत नसेल तर, तो असे उद्वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग चालू असताना घडणाऱ्या कोणत्याही अपघाताची सूचना आणि अहवाल देण्यासाठी ज्या शहरात किंवा गावात अशी इमारत असेल तेथे राहणाऱ्या एखाद्या व्यक्तीस प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून नेमील.

(३) पोट-कलम (२) अन्वये नेमलेल्या प्रत्येक प्रतिनिधीचे नाव विद्युत निरीक्षक (उद्वाहने) यास लेखी कळविण्यात येईल.

(४) राज्य शासनास, पुढील बाबींची चौकशी करण्यासाठी व अहवाल देण्यासाठी विद्युत निरीक्षक (उद्वाहने) यास प्राधिकृत करता येईल :—

(क) उद्वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग यांची संचमांडणी यामुळे किंवा त्याच्याशी संबंधित, जनतेच्या सुरक्षिततेला बाधा पोहोचेल असा कोणताही अपघात घडला असेल अशा अपघाताचे कारण ;

(ख) हा अधिनियम किंवा त्याखाली केलेले नियम यांच्या तरतुदींचा जेथवर कोणत्याही व्यक्तीच्या सुरक्षिततेस बाधा पोहचण्याशी संबंध आहे तेथवर त्या तरतुदींचे ज्या रीतीने आणि ज्या मर्यादेपर्यंत अनुपालन करण्यात आले नाही ती रीत व त्या मर्यादा.

विद्युत निरीक्षक (उद्वाहने) याचा त्या अपघाताच्या संबंधातील व त्याच्याशी निगडित चौकशीच्या संबंधातील निष्कर्ष अंतिम असेल.

(५) (क) पोट-कलम (४) अन्वये चौकशी करणाऱ्या प्रत्येक विद्युत निरीक्षक (उद्वाहने) यास किंवा अशा इतर व्यक्तीस, साक्षीदारांना उपस्थित राहण्यास आणि दस्तऐवज व महत्त्वाच्या वस्तू सादर करण्यास भाग पाडण्याच्या प्रयोजनार्थ, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ याअन्वये दिवाणी न्यायालयास जे जे अधिकार असतील, ते सर्व अधिकार असतील. (१९०८ चा ५.)

(ख) जिला, विद्युत निरीक्षक (उद्वाहने) याने किंवा उपरोक्तप्रमाणे अशा इतर व्यक्तीने कोणतीही माहिती सादर करण्यास भाग पाडले असेल ती प्रत्येक व्यक्ती भारतीय दंड संहितेच्या कलम १७६ च्या अर्थांतर्गत तसे करण्यासाठी कायदेशीररीत्या बांधील असेल. (१८६० चा ४५.)

**सूचना किंवा नोटीसा, आदेश किंवा दस्तऐवज बजाविणे.**

**१६.** (१) जी कोणतीही सूचना किंवा नोटीस, आदेश किंवा दस्तऐवज या अधिनियमान्वये किंवा तद्न्वये कोणत्याही व्यक्तीच्या नावे पाठविणे भाग असेल किंवा पाठविण्यासाठी प्राधिकार दिला असेल अशी प्रत्येक सूचना किंवा नोटीस, आदेश किंवा दस्तऐवज शीघ्र डाकेने बजाविण्यात येईल, किंवा,—

(क) जेव्हा तो स्थानिक प्राधिकाऱ्याचे नावे पाठवावयाचा असेल तेव्हा, तो स्थानिक प्राधिकाऱ्याच्या कार्यालयात पाठविण्यात येईल ;

(ख) जेव्हा तो कंपनीच्या नावे पाठवावयाचा असेल तेव्हा, तो कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात किंवा कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय भारताच्या बाहेर असल्यास, कंपनीच्या भारतातील मुख्य कार्यालयात पाठविण्यात येईल ;

(ग) जेव्हा तो कोणत्याही इतर व्यक्तीच्या नावे पाठवावयाचा असेल तेव्हा तो त्या व्यक्तीच्या नेहमीच्या किंवा शेवटी माहीत असलेल्या राहण्याच्या किंवा धंद्याच्या ठिकाणी पाठविण्यात येईल.

(२) जी कोणतीही नोटीस, आदेश किंवा दस्तऐवज या अधिनियमान्वये किंवा तद्न्वये कोणत्याही जागेच्या मालकाच्या किंवा त्याच्या प्राधिकृत प्रतिनिधीच्या किंवा त्याच्या भोगवटादाराच्या नावे पाठविणे भाग असेल किंवा पाठविण्यासाठी प्राधिकार दिला असेल अशी प्रत्येक नोटीस, आदेश किंवा दस्तऐवज हा जर तो " जागेचा मालक " किंवा " मालकाचा प्राधिकृत प्रतिनिधी " किंवा " भोगवटादार " असे वर्णन देऊन (व जागेचे नाव घालून) पाठविण्यात आला असेल तर, योग्य रितीने पाठविण्यात आला आहे असे मानण्यात येईल, आणि तो किंवा त्याची सत्यप्रत जागेत उपस्थित असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या स्वाधीन करून अथवा वाजवी दक्षता घेऊन ज्याच्या स्वाधीन करता येईल अशी कोणतीही व्यक्ती जागेत सापडत नसल्यास जागेच्या कोणत्याही ठळक भागावर लावून बजावता येईल.

**उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग यांचे नियतकालिक निरीक्षण.**

**१७.** (१) प्रत्येक उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग यांचे विद्युत निरीक्षक (उद्वाहने) याच्याकडून किंवा शासनाकडून याबाबतीत नियुक्त केलेल्या अशा अधिकाऱ्याकडून, वर्षातून किमान एकदा किंवा शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा त्याआधीच्या ठराविक कालांतराने नियतकालिक निरीक्षण करण्यात येईल.

(२) शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अशा नियतकालिक निरीक्षणासाठी आकारावयाच्या निरीक्षण शुल्काचा दर विनिर्दिष्ट करता येईल.

उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग यांचे परिरक्षण करणे.

**१८.** उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग यांचा प्रत्येक मालक, उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग यांची साफसफाई करणे, तेल घालणे, अनुयोजन करणे आणि दुरुस्ती करणे यांसह, समाधानकारक परिरक्षण करण्याकरिता, मान्यताप्राप्त कंत्राटदाराबरोबर, करार करील.

अनुज्ञप्ती निलंबित करणे किंवा रद्द करणे.

**१९.** या अधिनियमान्वये ज्या अनुज्ञप्तीधारकास अनुज्ञप्ती देण्यात आलेली आहे अशा अनुज्ञप्तीधारकाने जर या अधिनियमाच्या किंवा नियमांच्या कोणत्याही तरतुदींचे किंवा अनुज्ञप्तीच्या कोणत्याही शर्तींचे किंवा त्याला दिलेल्या निदेशांचे उल्लंघन केले असल्यास, मुख्य विद्युत निरीक्षक, अनुज्ञप्तीधारकास आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात आल्यानंतर, त्याला योग्य वाटेल अशा कालावधीकरिता, त्याबाबतची कारणे लेखी नमूद करून, त्याची अनुज्ञप्ती निलंबित करील किंवा ती रद्द करील.

अपील.

**२०.** (१) कलम ७ च्या पोट-कलम (३) अन्वये, उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग कार्यान्वित करण्यासाठी नकार दिल्याच्या किंवा कलम १९ अन्वये अनुज्ञप्तीचे निलंबन किंवा ती रद्द केल्याच्या मुख्य विद्युत निरीक्षकाच्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, असा आदेश दिल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, राज्य शासनाकडे, अपील करता येईल.

(२) (एक) कलम ८ च्या पोट-कलम (५) अन्वये विद्युत निरीक्षक (उद्वाहने) याने दिलेल्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, असा आदेश दिल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, मुख्य विद्युत निरीक्षकाकडे अपील करता येईल;

(दोन) कलम २१ च्या पोट-कलम (१) अन्वये, विद्युत निरीक्षक (उद्वाहने) याच्या आदेशाविरुद्ध मुख्य विद्युत निरीक्षक यांच्याकडे दाखल केलेल्या कोणत्याही अपिलामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, उद्वाहन किंवा सरकता जिना किवा सरकता मार्ग बंद ठेवण्याविषयी विद्युत निरीक्षक (उद्वाहने) याने दिलेल्या कोणत्याही आदेशाचे, मुख्य विद्युत निरीक्षकाने अशा आदेशास स्थगिती दिली नसेल तर पालन करण्यात येईल.

(तीन) मुख्य विद्युत निरीक्षकाने दिलेल्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, राज्य शासनाकडे, अपील करता येईल आणि राज्य शासनाचा अपिलावरील निर्णय हा अंतिम असेल.

असुरक्षित स्थितीत असलेले उद्वाहन किंवा सरकते जिने किंवा सरकता मार्ग.

**२१.** (१) राज्य शासनाने, याबाबतीत प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने निरीक्षण केल्यावर, जर त्याचे असे मत बनले असेल की, कोणत्याही इमारतीतील कोणतेही उद्वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग असुरक्षित स्थितीत आहे, तर तो विद्युत निरीक्षक (उद्वाहने) याला लेखी अहवाल सादर करील, जो, त्याच्या मालकास किंवा त्याच्या प्राधिकृत प्रतिनिधीस, त्याला, आवश्यक वाटतील त्याप्रमाणे असे उद्वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग यासंबंधात करावयाची अशी दुरुस्ती किंवा फेरफार, त्याने विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत करावी असा निदेश देता येईल आणि अशा उद्वाहनाचा किंवा सरकत्या जिन्याचा किंवा सरकत्या मार्गाचा वापर जोपर्यंत अशा दुरुस्त्या किंवा फेरफार करण्यात येत नाहीत तोपर्यंत किंवा अशी असुरक्षित स्थिती, त्याची खात्री पटेपर्यंत दूर करण्यात येत नाही, तोपर्यंत बंद ठेवावा, असा देखील आदेश देता येईल.

(२) मालक किंवा, यथास्थिति, त्याचा प्राधिकृत प्रतिनिधी, त्यानंतर, अशा आदेशाचे, त्यात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत पालन करील आणि आदेशाचे अशा रीतीने पालन करण्यात आल्याचे विद्युत निरीक्षक (उद्वाहने) यास ताबडतोब लेखी कळवील.

सील करणे.

**२२.** (१) ज्यासंबंधात कलम २१ च्या पोट-कलम (१) अन्वये निदेश दिलेले आहेत ते कोणतेही उद्वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग यासंबंधात त्या निदेशाचे विद्युत निरीक्षक (उद्वाहने) याची खात्री पटेपर्यंत पालन करण्यात आले नसताना, जर असे उद्वाहन किंवा सरकता जिना किंवा, यथास्थिति, सरकता मार्ग यांचा वापर होत असल्याचे आढळून आले असेल, तर विद्युत निरीक्षक (उद्वाहने) याच्याकडून ते सील करण्यात यावेत, असा आदेश देण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) खालील आदेशाविरुद्ध केलेले अपील, शासनाकडे दाखल करण्यात येईल व त्यावर शासनाने दिलेला निर्णय अंतिम राहील.

**२३.** मालक, अशा उद्‌वाहनाची किंवा सरकत्या जिन्याची किंवा सरकत्या मार्गाची उभारणी पूर्ण झाल्यानंतर, असे उद्‌वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग याचा वापर करणाऱ्या प्रवाशांना जोखीमीपासून संरक्षण देण्यासाठी म्हणून, त्रयस्थ पक्षकारासाठी विमा उतरवल्याची सुनिश्चिती करील. विमा.

**२४.** मालक, प्रत्येक उद्‌वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग यासाठी एक रोजवही ठेवील, आणि त्या रोजवहीत त्याचे कार्य, त्यातील बिघाड (वीजपुरवठा खंडित झाल्याव्यतिरिक्त) आणि अपघात, कोणताही असल्यास, यांबाबतच्या तपशिलाची नोंद घेईल. या रोजवह्यांची विद्युत निरीक्षक (उद्‌वाहने) याच्याकडून, त्यास इष्ट वाटेल तेव्हा, तपासणी करण्यात येईल. रोजवही आणि अहवाल देणे.

**२५.** उद्‌वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग यांच्या कोणत्याही सुरक्षाविषयक प्रयोजनांच्या सदोष कार्यामुळे उद्‌वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग यामध्ये अपघात घडल्यास त्याबाबतीत, असा अपघात अशा उद्‌वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग यांची उभारणी किंवा परिरक्षण करणाऱ्या कंपनीच्या निष्काळजीपणामुळे घडला असेल तर उद्‌वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग उभारणी किंवा परिरक्षण कंपनी यांच्यावरदेखील या अधिनियमाअन्वये खटला दाखल करता येईल आणि ती शिक्षेसाठी पात्र असेल. समवर्ती जबाबदारी.

**२६.** कोणत्याही इमारतीत बसविण्यात आलेले उद्‌वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग बंद झाला असेल तर, त्याविषयीची सूचना उद्‌वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग बंद झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कालावधीच्या आत मालकाकडून विद्युत निरीक्षक (उद्‌वाहने) यास देण्यात येईल. बंद करण्याविषयी सूचना.

**२७.** परिवास्तूमध्ये बसवण्यात आलेले उद्‌वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग, तो बसवल्यापासून वीस वर्षांच्या कालावधीनंतर किंवा कलम ८ अन्वये विद्युत निरीक्षक (उद्‌वाहने) याच्याकडून देण्यात आलेल्या निदेशाप्रमाणे, उद्‌वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग याच्या मालकाकडून बदलण्यात येईल. उद्‌वाहनाची कालमर्यादा.

**२८.** शासनास, लेखी आदेशाद्वारे, एखाद्या विशेष प्रकरणामध्ये, या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या कोणत्याही तरतुदी, त्यास योग्य वाटतील अशा मर्यादेपर्यंत आणि अशा शर्तींस अधीन राहून, शिथिल करण्याचा निदेश देता येईल. या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदी शिथिल करण्याचा अधिकार.

**२९.** राज्य शासनास, या अधिनियमान्वये किंवा तद्न्वये प्रदान केलेल्या नियम तयार करण्याच्या अधिकाराखेरीज कोणतेही अधिकार मुख्य विद्युत निरीक्षकाकडे किंवा विद्युत निरीक्षक (उद्‌वाहन)याचेकडे सोपवता येतील. शासनाचे अधिकार सोपवणे.

**३०.** या अधिनियमान्वये शुल्क म्हणून देय असलेल्या सर्व रकमा, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसुलीयोग्य असतील. शुल्काची वसुली.

**३१.** या अधिनियमाच्या तरतुदी, शासनाने बसवलेले उद्‌वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग यांना लागू होतील आणि उक्त तरतुदी असे उद्‌वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग यांस लागू करताना, त्यात पुढीलप्रमाणे अनुकूलन किंवा फेरबदल केले असल्याचे मानण्यात येईल :— शासनाच्या मालकीचे उद्‌वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग यांना अधिनियम लागू करणे.

१. कलम ९ च्या पोट-कलम (१) मध्ये, " ज्या जागी सरकता जिना किंवा सरकता मार्ग बसवण्यात आला असेल त्या जागेचा प्रत्येक मालक " या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

" ज्या शासनाने किंवा ज्याच्या वतीने सरकता जिना किंवा सरकता मार्ग बसविण्यात आला आहे, ते शासन अनुज्ञप्तीसाठी अर्ज करील. " .

२. कलम १५ च्या पोट-कलम (२) मध्ये, " ज्या इमारतीत उद्‌वाहन " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " अशा इमारतीत राहत नसेल तर, " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

" ज्या इमारतीत शासनाकडून उद्‌वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग बसवण्यात आला आहे, अशा इमारतीसाठी शासन, " .

३. कलम १६ च्या पोट-कलम (१) याचा खंड (क) याऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :-

" (क) जेव्हा शासनाला पाठवावयाचा असेल, तेव्हा कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये अशा शासनाद्वारे नियुक्त केलेल्या प्रतिनिधीच्या कार्यालयात ; " .

४. कलम ३२ वगळण्यात येईल.

प्रकरण पाच

**शास्ती**

शास्ती.

**३२.** जो कोणी, या अधिनियमाच्या तरतुदींचे किंवा नियमांचे किंवा अनुज्ञप्तीच्या शर्ती किंवा या अधिनियमान्वये किंवा नियमान्वये विद्युत निरीक्षक (उद्‌वाहने) याने दिलेल्या निदेशांचे उल्लंघन करील, तो, अपराध सिद्ध झाल्यावर, पन्नास हजारांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल आणि असे उल्लंघन चालू राहिल्यास अशा पहिल्या उल्लंघनाबद्दल दोषी ठरविण्यात आल्यानंतर ज्या ज्या दिवशी असे उल्लंघन चालू राहील त्या प्रत्येक दिवसासाठी एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या आणखी द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल.

व्यवसाय संस्था किंवा कंपन्या यांनी केलेले अपराध.

**३३.** (१) या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमांन्वये एखाद्या व्यवसाय संस्थेने किंवा कंपनीने अपराध केला असेल त्याबाबतीत असा अपराध घडला त्यावेळी जिच्याकडे व्यवसाय संस्था किंवा कंपनीचा प्रभार होता आणि जी, व्यवसाय संस्था किंवा कंपनीचे कामकाज चालविण्यास व्यवसाय संस्थेस किंवा कंपनीस जबाबदार होती अशी प्रत्येक व्यक्ती, त्याचप्रमाणे ती व्यवसाय संस्था किंवा कंपनीदेखील, अशा अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि तिच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा दिली जाण्यास ती पात्र असेलः

परंतु, अशा कोणत्याही व्यक्तीने असा अपराध तिच्या नकळत घडला किंवा असा अपराध घडू नये म्हणून तिने सर्वतोपरी प्रयत्न केले होते असे सिद्ध केल्यास, या पोट-कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही बाबीमुळे अशी व्यक्ती, या अधिनियमान्वये कोणत्याही शिक्षेस पात्र असणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, हा अधिनियम किंवा त्याखाली केलेले नियम यांखालील एखादा अपराध व्यवसाय संस्थेने किंवा कंपनीने केला असेल, आणि, तो अपराध व्यवसाय संस्थेचा किंवा कंपनीचा कोणत्याही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारी यांच्या संमतीने किंवा त्याने दुर्लक्ष केल्यामुळे घडला आहे असे सिद्ध झाल्यास, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारी देखील त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल व त्याच्याविरुद्ध कारवाई केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा दिली जाण्यास तो, पात्र असेल.

**स्पष्टीकरण.–** या कलमाच्या प्रयोजनासाठी,—

(क) " कंपनी " याचा अर्थ, कोणताही निगम निकाय असा आहे, ज्यात व्यवसाय संस्था किंवा व्यक्तींचे इतर संघ किंवा निकाय, मग ते विधिसंस्थापित असोत किंवा नसोत, यांचा समावेश होतो, आणि

(ख) व्यवसाय संस्थेच्या बाबतीत " संचालक " याचा अर्थ, व्यवसाय संस्थेतील भागीदार, असा आहे, आणि व्यक्तींचा कोणताही संघ किंवा निकाय यांच्या बाबतीत, त्याचे कामकाज नियंत्रित करणारा कोणताही सदस्य, असा आहे.

अपराध दखलपात्र असणे.

**३४.** कोणतेही न्यायालय, शासनाच्या किंवा राज्य शासनास याबाबतीत प्राधिकृत करता येईल अशा विद्युत निरीक्षक (उद्‌वाहने) याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा अधिकाऱ्याच्या पूर्व मंजुरीखेरीज या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची दखल घेणार नाही.

सद्‌भावनापूर्वक केलेल्या कृत्यांना संरक्षण.

**३५.** या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियम किंवा आदेशान्वये सद्‌भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजिलेल्या कोणत्याही कृतीबद्दल मुख्य विद्युत निरीक्षक, विद्युत निरीक्षक (उद्‌वाहने), सहायक विद्युत निरीक्षक (उद्‌वाहने) किंवा शासनाने प्राधिकृत केलेला इतर कोणताही अधिकारी यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा कायदेशीर कारवाई दाखल करता येणार नाही.

प्रकरण सहा

## संकीर्ण

**३६.** (१) जेव्हा मालक, भोगवटादार किंवा चालक हा उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग यांचा, उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग म्हणून वापर करण्यात येऊ नये असे घोषित करील किंवा तसा इशारा देईल तेव्हा कोणतीही व्यक्ती, असे उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग यांचा वापर करणार नाही : उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग यांच्या वापरास प्रतिबंध.

परंतु, या पोट-कलमातील कोणतीही गोष्ट, ज्या व्यक्तीस असे उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग यांच्या दुरुस्तीसाठी त्यांचा वापर करण्यास परवानगी देण्यात आली असेल, अशा व्यक्तीच्या संबंधात लागू होणार नाही.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदींचे कोणतेही उल्लंघन हा एक अपराध ठरेल आणि कलम ३२ अन्वये तो शिक्षापात्र असेल.

**३७.** (१) राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील. नियम करण्याचा अधिकार.

(२) पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध न येता, अशा नियमात विशेषतः पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींसंबंधी तरतूद करता येईल :—

(क) कलम ३ ची पोट-कलमे (१) आणि (४) अन्वये मुख्य विद्युत निरीक्षक, विद्युत निरीक्षक (उद्वाहने) आणि सहायक विद्युत निरीक्षक (उद्वाहने) म्हणून नेमणूक करण्यासाठीच्या व्यक्तीची अर्हता ;

(ख) कलम ३ च्या पोट-कलम (५) अन्वये विद्युत निरीक्षक (उद्वाहने) आणि सहायक विद्युत निरीक्षक (उद्वाहने) यास सहाय्य करण्यासाठी तांत्रिक व इतर व्यक्ती म्हणून नेमणूक करण्यासाठी व्यक्तीने धारण करावयाची अर्हता ;

(ग) कलम ४ च्या पोट-कलम (१) अन्वये उद्वाहन, सरकता जिना व सरकता मार्ग उभारण्यासाठी किंवा बसविण्यासाठी परवानगी घेण्याकरिता अर्ज ज्या नमुन्यात करण्यात येईल तो अर्जाचा नमुना आणि उद्वाहन, सरकता जिना व सरकता मार्ग उभारण्याची योजना ज्या रीतीने सादर करण्यात येईल, ती रीत आणि उद्वाहन, सरकता जिना व सरकता मार्ग उभारण्यासाठी परवानगी घेण्याकरिता अर्जामध्ये विनिर्दिष्ट करावयाचा असा इतर तपशील ;

(घ) उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग उभारण्यासाठी, त्यांच्या परिरक्षणासाठी व चाचणीसाठी कलम ५ च्या पोट-कलम (१) अन्वये विद्युत कंत्राटदाराला अनुज्ञप्तीकरिता अर्जाचा नमुना व अनुज्ञप्तीचा नमुना आणि अनुज्ञप्ती देण्यासाठीच्या अटी व शर्ती आणि तिच्या नूतनीकरणासाठीच्या अर्जाचा नमुना ;

(ङ) कलम ६ अन्वये ज्या रीतीने उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग यांचे निरीक्षण करण्यात येईल ती रीत ;

(च) कलम ७ खालील उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग चालू करण्यासाठीच्या अनुज्ञप्तीसाठीच्या अर्जाचा नमुना ; त्याच्या अटी व शर्ती आणि ज्या नमुन्यात अनुज्ञप्ती देण्यात येईल तो नमुना ;

(छ) कलम १२ खाली उद्वाहन, सरकता जिना व सरकता मार्ग यांचे विनिर्देश ;

(ज) कलम १५ खालील ज्या नमुन्यात अपघाताची सूचना आणि अहवाल देण्यात येईल तो नमुना आणि ज्या मुदतीत अपघाताची सूचना आणि अहवाल देण्यात येईल ती मुदत ;

(झ) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, आवश्यक असेल किंवा विहित करण्यात येईल अशी इतर कोणतीही बाब.

(३) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनात मिळून, एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल, ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, जर त्या नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहे सहमत होतील

किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहे सहमत होतील, आणि असा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित करतील तर, अशी अधिसूचना **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून, तो नियम केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल, किंवा, यथास्थिति, अंमलात येणार नाही ; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे त्या नियमान्वये पूर्वी करण्यात आलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

अधिनियम कोणत्याही इतर कायद्यात भर घालणारा असेल, आणि न्यूनीकरण करणारा नसेल.

**३८.** या अधिनियमाच्या तरतुदी, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमात भर घालणाऱ्या असतील व त्याचे न्यूनीकरण करणाऱ्या नसतील.

१९३९ चा १० याचे निरसन व व्यावृत्ती.

**३९.** हा अधिनियम अंमलात आल्यानंतर महाराष्ट्र उद्वाहक अधिनियम निरसित होईल : १९३९ चा १०.

परंतु, अशा निरसनामुळे,—

(क) कोणताही नियम, अधिसूचना, निरीक्षण, काढलेला किंवा दिलेला आदेश किंवा नोटीस यांसह, केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टी किंवा कार्यवाही, यांवर कोणताही परिणाम होणार नाही ; किंवा

(ख) कोणतीही नेमणूक, केलेले समर्थन किंवा प्रतिज्ञापन, किंवा दिलेली कोणतीही अनुज्ञप्ती, परवानगी, अधिप्रमाणन किंवा अपवाद यावर कोणताही परिणाम होणार नाही ; किंवा

(ग) निरसित झालेल्या अधिनियमान्वये निष्पादित केलेला कोणताही दस्तऐवज किंवा संलेख किंवा दिलेला कोणताही निदेश हा, जेथवर या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल तेथवर, या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींन्वये केलेला किंवा काढलेला आहे असे मानण्यात येईल ;

(घ) हा अधिनियम अधिनियमित होण्यापूर्वी, सुरू करण्यात आलेले कोणतेही अन्वेषण, कायदेशीर कार्यवाही किंवा उपाययोजना, जणू काही हा अधिनियम अधिनियमित झालेला नव्हता असे समजून चालू राहील किंवा अंमलात येईल.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**४०.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप, अशी अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांकरिता, त्याला आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल अशी कोणतीही गोष्ट, **राजपत्रात** आदेश प्रसिद्ध करून करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.